# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-१४३ दिनांक - १३/०४/२०२४

## कर्नाटक राज्यातुन फसवुणक करुन अपहार केलेला करोडो रुपये किमंतीचा काजु हस्तगत करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश

फिर्यादी नामे मोहनदास विठ्ठल शेट्टी यांचा उडपी राज्य कर्नाटक येथे रॉ मटेरीयल घेवुन काजु तयार करण्याची श्रीकृष्ण नांवाची फॅक्टरी, मोड्डुगुड्डे, शिरुरु, उडपी, कर्नाटक येथे आहे. दिनांक ०२.०४.२०२४ रोजी मिळालेल्या ऑर्डर नुसार २४.६३ मेट्रीक टन एकुण किमंत १,२१,७६,५९८/-रुपये किमंतीचा काजु असा माल उडपी, कर्नाटक येथुन सुरत व अहमदाबाद राज्य गुजरात येथे २४६९ बॉक्समध्ये भरुन ट्रक क्र. जी.जे.२७-टीएफ-०६१६ मधुन भरुन पाठविण्यात आलेला होता परंतु सदरचा माल सुरत व अहमदाबाद राज्य गुजरात येथे न पोहचल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन ब्रम्हावर पोलीस ठाणे जि.उडपी, कर्नाटक गुनोक्र. ९५/२०२४ भादविसक ४०६, ४२०, ३४ प्रमाणे ०३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल आहे.

नमुद गुन्हा दाखल झाले बाबत बातमीदारामार्फत माहीती प्राप्त झाल्याने लागलीच बम्हावर पोलीस ठाणे जि.उडपी, कर्नाटक येथील पोलीस पथकास संपर्क साधुन दाखल गुन्हयाबाबत अधिक माहीती घेण्यात आली. सदर माहीतीचे आधारे तांत्रीक विश्लेषण तसेच बातमीदाराकडुन आरोपी यांनी अपहार केलेला मुद्देमाल नालासोपारा येथे एका व्यापाराकडे लपवुन ठेवला असल्याची खात्रीशिर माहीती मिळाली. त्याअनुषगांने नालासोपारा तसेच वाशी, नवी मुंबई येथुन १० किलो ग्रॅम वजनाचे १८५४ बॉक्स असा एकुण ९२,७०,०००/-रुपये किमंतीचा काजु मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्षाकडुन हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.मदन बल्लाळ मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, सपोनिरी. दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, पोउपनिरी.हितेंद्र विचारे, सपोउपनिरी. श्रीमंत जेधे, पोहवा.मनोहर तावरे, पोहवा.संग्राम गायकवाड, पोहवा.संतोष मदने, पोहवा.हनुमंत सुर्यवंशी, पोहवा.गोविंद केंद्रे, पोहवा.सतिश जगताप, पोहवा.आसिफ मुल्ला, पोहवा.राजविर संधु, पोहवा.प्रविणराज पवार, पोहवा. अनिल नागरे, पोशि.नितीन राठोड, पोशि.अंगद मुळे, सफौ.संतोष चव्हाण, मसुब.सचिन चौधरी यांनी केली आहे.


मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा,
मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय
GOODS CARRIER
CHETAN RAJE